**निधी वितरण सन २०२६-२०२७**

आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना केंद्र पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (४०%)२२१०जी४९४(TSP) ३१-सहायक अनुदाने या लेखाशिर्षांतर्गत **रु. ५७,२१,४०,४१९/-** इतका निधी वितरीत करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः क्र.-प्रजयो-२०२६/प्र.क्र.७१/ई-१६६४६२७/MJPJAY&AB-PMJAY**

गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,
मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई
दिनांक: २१ ऑगस्ट,२०२६

**वाचा -**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दि.२८ जुलै, २०२३.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. लेखाप्र-२०२४/प्र.क्र.२१७/LB/आरोग्य-६, दि. २० फेब्रुवारी, २०२५
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. प्रजयो-२०२६/प्र.क्र.७१/ई-१६६४६२७/ MJPJAY&AB-PMJAY, दि.११ जून,२०२६
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: पूरक-२०२६/प्र.क्र.६१/अर्थ-३, दि.०३ जुलै, २०२६
५) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि. २१ जुलै, २०२६
६) राज्य आरोग्य हमी सोसायटी पत्र क्र.राआहसो/लेखा/काअ/१२३०२/१७४२/२०२६,दि.०३ ऑगस्ट, २०२६

**प्रस्तावना :-**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भाधीन अ.क्र.१ येथील दि. २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दि. ०१ जुलै, २०२४ पासून राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत हमी तत्वावर(Assurance Mode) राबविण्यात येत आहे. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या दि.०३ ऑगस्ट,२०२६ च्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयांचे अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठीचे दावे अदा करण्यासाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीस निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी २२१०जी ४९४ (अनु. जमाती) ३१-सहायक अनुदाने या लेखाशिर्षाखाली मूळ अर्थसंकल्पित तरतूद रु. ५७.०० कोटी तसेच जून-जुलै २०२६च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर रु. ४२.७२३१ कोटी असे एकूण रु. ९९.७२३१ कोटी तरतूद उपलब्ध आहे. सदर तरतुदीपैकी संदर्भ क्र. ३ येथील दि. ११ जून, २०२६ च्या शासन

निर्णयान्वये रु. २४,८६,२४,६९५/- (अक्षरी चोवीस कोटी शहाऐंशी लक्ष चोवीस हजार सहाशे पंच्याण्णव फ़क्त) इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. वितरणासाठी उपलब्ध रू. ७४,८६,०६,३०५/-(अक्षरी चौ-याहत्तर कोटी शहाऐंशी लक्ष सहा हजार तिनशे पाच फ़क्त) तरतुदीपैकी रु. ५७,२१,४०,४१९/- (रुपये सत्तावन्न कोटी एकवीस लाख चाळीस हजार चारशे एकोणीस मात्र) एवढी रक्कम, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थी रुग्णांना लाभ देण्यासाठी रुग्णालयांना दाव्यांची अदायगी करण्याकरीता राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या ८४४३- नागरी ठेवी, १०६-वैयक्तिक लेखा, (००) (०२) आभासी वैयक्तिक ठेव लेखा खाते (VPDA) यामध्ये, आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक यांच्या नावे सुपुर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात खालील लेखाशिर्षाखाली मंजूर झालेल्या तरतूदीच्या मर्यादेत खर्च करण्यात यावा :-

**मागणी क्रमांक टी-५**

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०३ - ग्रामीण आरोग्य सेवा - विषम चिकित्सा

७९६ - जन जाती क्षेत्र उपयोजना

(०१) - जन जाती क्षेत्र उपयोजना

(०१)(०७) - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (कार्यक्रम) (राज्य हिस्सा ४०%)

**२२१० जी ४९४, ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर)**

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात येत आहे:-

१) सदरचा निधी हा आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठीचे आरोग्य संरक्षणापोटी अंगीकृत रुग्णालयांच्या दाव्यांची अदायगी करण्याकरिता खर्च करण्यात यावा.

२) सदरचा निधी मंजूर प्रयोजनासाठीचे खर्च किंवा उपयोगिता आणल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात आहरण व संवितरण अधिकारी तसेच सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना सादर करावे.

४. सदरील खर्च हा सशर्त असून केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व योजनेच्या प्रगतीचा अहवाल केंद्र व राज्य शासनास विहित प्रपत्रात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी पाठविण्यात यावा. तसेच सदरील निधी हा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात यावा. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी प्राप्त झालेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

५. राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई या कार्यालयास निधीचा विनियोग करण्यासाठी “आभासी वैयक्तिक ठेव लेखा (Virtual Personal Deposit Account-VPDA)” ही व्यवस्था संदर्भ क्र. ०२ येथील दिनांक २० फ़ेब्रुवारी, २०२५ च्या शासन निर्णयान्वये लागू केलेली आहे. आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक यांनी वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दिनांक १४ फ़ेब्रुवारी, २०२४ व विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील दिनांक २० फ़ेब्रुवारी,२०२५ मधील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे. सदर

अनुदानाचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तसेच सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी असतील.

६. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून रु. ५७,२१,४०,४१९/- (रुपये सत्तावन्न कोटी एकवीस लाख चाळीस हजार चारशे एकोणीस मात्र) एवढा निधी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अंतर्गत नव्याने उघडण्यात आलेल्या आभासी वैयक्तिक ठेव लेखा खाते (VPDA) मध्ये जमा करुन खर्च करण्यात येत असल्याचे त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०३ जुलै, २०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित असलेल्या सर्व तरतूदींचे/ अटी व शर्तीचे पालन झाल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: पूरक-२०२६/प्र.क्र.६१/अर्थ-३, दि.०३ जुलै,२०२६ नुसार व आदिवासी विकास विभागाच्य शासन परिपत्रक क्रमांक: बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६,दि. २१ जुलै, २०२६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२११५१४२२८९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEELAM GIRISH SANGWAI

Digitally signed by NEELAM GIRISH SANGWAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=4389697B2E08F599022D51358524ED17C7CE03DE4F7A33193D64A9A0B4FEA4DD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=81E4E52421D72A2AE32DF6C7D06ABB4E6A7B5820C3A929F328AD6C0DCA4F38C7, cn=NEELAM GIRISH SANGWAI
Date: 2026.08.21 17:22:47 +05'30'

**(नीलम संगवई)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
६. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
७. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. (३ प्रती)
९. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय, मुंबई
१०.वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१४/अर्थसंकल्प-१९, मंत्रालय, मुंबई-३२.
११.आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६),मंत्रालय,मुंबई
१२.अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवड नस्ती.